**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. 269/2016**
**निशाणी क्र. 28 खाली**

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदाराचा पुढील सरतपास विधीज्ञ श्री. बी.व्ही.मिटकरी यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>** :-

१. मी पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे व त्यातील संपुर्ण मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. आमच्या संस्थेने प्रस्तुत प्रकरण न्यायालयात दाखल करण्या संदर्भात मला ठरावान्वये अधिकार दिलेले आहेत. सदरचे अधिकारपत्र मी अभिलेखावर दाखल केलेल आहे. आता मला सदरचे अधिकारपत्र दाखण्यात आले. त्यावर आमच्या संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांच्या सह्या आहेत. त्या मी ओळखतो. सदर अधिकारपत्रास **<u>नि.क. ३८</u>** देण्यात येतो. आरोपीने आमच्या संस्थेला दिलेला मुळ धनादेश आता मला दाखविण्यात आला. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **निशाणी ३९** देण्यांत येते. सदर धनादेश आमच्या संस्थेने संस्थेचे खाते असलेल्या प्रियदर्शनी अर्बन को.ऑप. बॅकेत वटवण्यासाठी जमा केला होता. त्यांनी तो पुढे आरोपीचे खाते असलेल्या स्टेट बॅक ऑफ इंडीया शाखा कळंब या शाखेकडे वर्ग केला. त्याबाततचे पत्र आता मला दाखवण्यात आले. ते तेच आहे. त्यास **<u>नि.क. ४०</u>** देण्यात येते. सदर धनादेश न वटल्यामुळे आरोपीच्या बॅकेने मेमोसह परत दिला. तो मेमो आता मला दाखविण्यांत आला. तो **निशाणी ४१** वर आहे. आमच्या संस्थेने आरोपीस पाठविलेली नोटीसची स्थळप्रत आता मला दाखविण्यात आली. त्यावर तत्कालीन व्यवस्थापक राहुल परदेशी यांची सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकूर माझ्या माहिती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निक. ४२</u>** देण्यात येतो. सदर नोटीस पोस्टाने पाठवल्याबाबातची पावती आता मला दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यास **<u>नि.क. ४३</u>** देण्यात येते. सदर नोटीस आरोपीस मिळाल्याची आरपीएडी ची पोच पावती आता मला दाखविण्यात आली. ती **निशाणी कमांक ४४** वर आहे. आमच्या पतसंस्थेकडे असलेल्या आरोपीच्या खात्याचा उता-याची प्रमाणित प्रत मी अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्यावर तत्कालीन व्यवस्थापकांची सही आहे. त्यातील मजकूर कार्यालयीन अभिलेखाप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क. ४५</u>** देण्यात येते.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. डी.व्ही. वाघमारे यांचेमार्फत</u>** :-

२. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झालेले आहे. मी दिनांक ०१/०८/२०१९ पासुन फिर्यादी संस्थेत कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे आगोदर संस्थेचे

तत्कालीन व्यवस्थापक कुंभार बालाजी सौदागर, परदेशी राहुल, अक्षय दिगंबर ढोले यांना संस्थेने प्रस्तुत प्रकरण चालवण्याचे अधिकार दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांना दिलेले अधिकार हे प्रस्तुत प्रकरण चालविण्याचे शेवटपर्यंतचे/प्रकरण संपेपर्यंतचे अधिकार आहेत. हे म्हणणे खरे आहे की, **नि.क. ३८** वरील अधिकारपत्रामध्ये प्रस्तुत प्रकरणाचा क्रमांक नमुद केलेला नाही.

३. आरोपी हा आमच्या संस्थेचा ०१/०६/२०१२ पासुन सभासद आहे. आरोपीला त्याचे पगार पाहुन आमच्या संस्थेने कर्ज दिले आहे. कर्ज वाटप करताना आरोपी कडून त्याचे पगारपत्रक व हमीपत्र घेण्यात आले होते. आरोपीने आमच्या संस्थेकडे दिनांक ०१/०६/२०१२ चे आगोदर आठ दिवस आगोदर मागणी केली असावी. त्यास आमच्या संस्थेने २,५०,०००/- एवढे कर्ज मंजूर केले होते. आमच्या संस्थेचा व्याजदर हा कर्ज रकमेवर १६ टक्के द.सा.द.शे. असा आहे. दिनांक १७/०३/२०१६ रोजी आरोपी हा त्याच्या खात्याचा हिशोब बघण्यास आमच्या संस्थेत आला होता. त्याने आमच्या संस्थेस दिनांक १७/०३/२०१६ रोजीच वादातील धनादेश दिला होता. सदर वादातीत धनादेशाचा क्रमांक हा ११०१११ असा आहे. आरोपीचा खाते क्रमांक मला आज सांगता येत नाही. आमच्या पतसंस्थेचा खाते क्रमांक ७७७ असा आहे. दिनांक १७/०३/२०१६ रोजीच सदरचा धनादेश वटवण्यासाठी आमच्या संस्थेचे खाते असलेल्या प्रियदर्शनी अर्बन को.ऑप. बॅंकत पाठविण्यात आला. दिनांक १६/०४/२०१७ रोजी आरोपीच्या खात्यात धनादेश वटवण्यासाठी पुरेशी रक्कम नसल्याचा शेरा आला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आम्ही आरोपीला कोणतीही कायदेशिर नोटीस सदरची रक्कम मागणी करण्यास पाठविली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आमच्या संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची फेड प्रत्येक महिन्याला त्याचे पगारातून नियमितपणे होत होती. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या पतसंस्थेत आरोपीचे रुपये २५,०००/- चे भाग भांडवल आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरेपीने आजातागायत कर्जापोटी आमच्या संस्थेस वेळोवेळी असा एकूण ९०,०००/- रुपयांचा भरणा केलेला आहे. आरोपी आज रोजी नोकरीस नाही किंवा कसे याबबत मला कल्पना नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, कर्ज मंजूर करतेवेळी आमच्या संस्थेने आरोपीकडून त्याच्या खात्याचे तीन कोरे धनादेश सहीनिशी घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की,

त्यापैकी एका धनादेशाचा दुरुपयोग करुन प्रस्तुत प्रकरण आमच्या संस्थेने दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा आमच्या संस्थेचे धनादेशातील रक्कम रुपये ३,५५,६२४/- देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आमच्या संस्थेस कायदेशिर दायीत्वापोटी कोणताही धनादेश दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दाखल करुन खोटे शपथपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी संस्थेला मदत व्हावी म्हणून आज खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास पूर्ण.

**<u>फेरतपास-नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

RAVINDRA PRALHAD BATHE
Digitally signed by RAVINDRA PRALHAD BATHE
Date: 2022.07.29 16:49:57 +0530

दिनांक :- २९-०७-२०२२.

(आर.पी.बाठे)
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,
(कोर्ट नं.१) कळंब.